महाराष्ट्र शासन-कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० व, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२ -२२१६३३५१/२ ईमेल - pmu@mahapocra.gov.in

**NDKSP-17023(21)/6/2025-17 2622505** दिनांक:- ३०.०३.२०२६

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (नागपूर, लातूर, नाशिक, अमरावती व छत्रपती संभाजीनगर)
२. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (प्रकल्पातील २१ जिल्हे)

**विषय :-** नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा - २ अंतर्गत मृद व जलसंधारण कामाकरिता प्रापण विषयक मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत.

**संदर्भ :-१) कृषी आयुक्तालय मार्गदर्शक सूचना -जा.क्र.मृदसं./मृद -६/ई-निविदा /१२६०१ /२०२३ दि .६ एप्रिल २०२३**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा -२ हा महाराष्ट्र शासनाचा प्रकल्प जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यामधील ७२०१ गावांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पाचा उद्देश प्रकल्प जिल्ह्यातील/ प्रकल्प गावांतील अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या शेती पद्धतीमध्ये हवामानातील अनुकूलता आणि नफा वाढविणे आहे.

सदर प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सुक्ष्म नियोजन प्रक्रियेद्वारे तंयार करण्यात आलेल्या गाव अनुकूलन आराखड्यामध्ये पाण्याच्या ताळेबंदावर आधारित प्रस्तावित केलेली मृद व जलसंधारण कामे राबविणे प्रस्तावित आहे .

सदर कामांची अंमलबजावणी करताना प्रापण मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून प्रापण प्रक्रिया पारदर्शक व एकसमान पद्धतीने राबविणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रकल्प २१ जिल्यांमध्ये मृद व जलसंधारण कामे यशस्वीरित्या राबिवण्यासाठी ग्राम कृषी विकास समिती व उप विभागीय कृषी अधिकारी यांच्यासाठी प्रापण मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आली असून सोबत सह्पात्रीत करण्यात येत आहे. या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रापण विषयक प्रक्रिया पार पाडणे बंधनकारक आहे.

**सोबत:-** प्रापण मार्गदर्शक सूचना .

परिमल सिंह
प्रकल्प संचालक

**प्रत- माहितीस्तव सादर**

१. उपविभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत २१ जिल्हे)

महाराष्ट्र शासन

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

(महाराष्ट्र शासन कृषि जागतिक बँक यांचा संयुक्त प्रकल्प)

कृषि विभाग

Maharashtra Project on Climate Resilient Agriculture

(Project of Government of Maharashtra in Partnership with the World Bank)

# मृद व जलसंधारण कामांकरिता प्रापण मार्गदर्शक सूचना


**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA)**

**30 ब अर्केड, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई 400 005**

**संकेत स्थळ : www.mahapocra.gov.in**

**दूरध्वनी क्र. 022-22163351/52**

# मृद व जलसंधारण कामांसाठी ई- निविदा प्रक्रिया मार्गदर्शक सूचना

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत गावस्तरावर सूक्ष्म नियोजन प्रक्रिया राबवून गाव अनुकूलन आराखडा तयार करण्यात येत आहेत. सदर आरखडयामध्ये गावामध्ये वैयक्तिक लाभाच्या बाबी, कृषी व्यवसाय विषयक घटक यासोबतच मृद व जलसंधारण कामांची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहेत. प्रकल्पांतर्गत गावस्तरावर मृद व जलसंधारण कामांची अंमलबजावणी करताना प्रापण प्रक्रिया पारदर्शक, स्पर्धात्मक व नियमानुसार होण्यासाठी फक्त खुल्या ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक आहे.

प्रकल्पांतर्गत प्रसिद्ध होणार्या ई-निविदा खुल्या पद्धतीने होणार आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे निविदांचे आरक्षण असणार नाही.

**प्रापण प्रक्रिया कार्यपद्धती**

प्रकल्पांतर्गत मृदा व जलसंधारण कामाच्या प्रापण प्रक्रियेसाठी ई-निविदा प्रक्रिया बंधनकारक आहे. त्यानुसार प्रकल्पांतर्गत सर्व मृद व जलसंधारण कामे हि **www.mahatender.gov.in** पोर्टल वरुन खुल्या स्पर्धात्मक ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करून पूर्ण करण्यात यावीत.

जिल्हा समन्वय समितीकडून मंजूर झालेल्या गावाच्या गाव अनुकूलन आराखड्यानुसार प्रस्तावित मृद व जल संधारण कामांची, अंदाजपत्रके तयार करून, सदर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर ग्राम कृषी विकास समिती / उप विभागीय कृषी अधिकारी स्तरावर प्रापण प्रक्रिया राबविण्यात यावी. **मृद व जलसंधारण कामाची ई निविदा प्रक्रिया राबविताना गावनिहाय निविदा काढण्यात याव्यात. ग्राम कृषी विकास समिती अंतर्गत एका पेक्षा अधिक गावे समाविष्ट असल्यास अशा गावांच्या बाबतीत एकत्रित ई-निविदा प्रसिद्ध करता येतील.**

**निविदेचे टप्पे:**

**समुदाय आधारित प्रापण:**

ग्राम कृषी विकास समितीच्या आणि त्यायोगे ग्रामपंचायतीच्या सशक्तीकरणाचा आणि स्वावलंबनाचा उद्देश लक्षात ठेवून मृद व जलसंधारण कामांसाठी विशेष प्रापण कार्यपद्धती तयार करण्यात येत आहे. त्यासाठी या प्रकल्पामध्ये ग्राम कृषी विकास समितीला मृद व जलसंधारण कामांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. सर्व कामे ई-निविदाद्वारे करणेसाठी ई-निविदा काढण्याचे अधिकार ग्राम कृषि विकास समितीस्तरावरील खरेदी (प्रापण) समितीस असतील. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव ग्राम कृषी विकास समिती स्वतंत्रपणे मृद व जलसंधारणाच्या कामांची प्रापण प्रक्रिया करण्यास असमर्थ असल्यास व तसा ग्राम कृषि विकास समितीने ठराव दिल्यास संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी सदरचे काम करतील. याबाबत, मृद व जलसंधारण कामांची ई-निविदा ग्राम कृषी विकास समिती स्तर किंवा उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावर करणेसाठी, ग्राम कृषीविकास समितीच्या बैठकीत ठराव घेण्यात यावा. दोन्ही स्तरावरील प्रापण समिती ( ई निविदा समिती) स्वतंत्ररीत्या काम करतील.

प्रकल्पांतर्गत काढण्यात आलेल्या डिजिटल स्वाक्षरी (DSC) चा वापर करून ग्राम कृषी विकास समिती / उविकृअ कार्यालयाने महाटेंडर पोर्टलद्वारे ई-निविदा प्रक्रिया राबविणे बंधनकारक आहे.

**मॉडेल १- ग्राम कृषी विकास समिती स्तरावरील प्रापण समिती:**

ग्राम कृषी विकास समिती स्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी खालीलप्रमाणे निविदा समिती गठीत करावी. निविदांची छाननी व स्वीकृती या समितीने करणे बंधनकारक राहील.

ग्राम कृषी विकास समिती स्तरावर ई-निविदा प्रक्रिया करताना, सरपंच, उपसरपंच व उप कृषि अधिकारी यांचेकडील प्रकल्पांतर्गत काढण्यात आलेल्या डिजिटल "कि" चा वापर करण्यात यावा व समितीस्तरावरून ई-निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

| अ. क्र. | पद | पदनाम | भूमिका |
|---|---|---|---|
| १ | **सरपंच** | **अध्यक्ष** | **टेंडर क्रिएटर/ओपनर/प्रकाशक/मूल्यांकनकर्ता** |
| २ | **उपसरपंच** | **सदस्य** | **टेंडर क्रिएटर/ओपनर/प्रकाशक/मूल्यांकनकर्ता** |
| ३ | **उप कृषी अधिकारी** | **सदस्य सचिव** | **टेंडर क्रिएटर/ओपनर/प्रकाशक/मूल्यांकनकर्ता** |
| ४ | सहाय्यक कृषि अधिकारी | सदस्य | |
| ५ | ग्राम कृषि विकास समितीचे १ सदस्य | सदस्य | |

**मॉडेल २- उपविभागीय स्तरावरील निविदा समिती**

उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय स्तरावर ई-निविदा तपासणी तसेच कंत्राटदारांची पात्रता निकषांच्या आधारे सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे निविदा समिती गठीत करावी. निविदांची छाननी व स्वीकृती या समितीने करणे बंधनकारक राहील.

| अ. क्र | पद | पदनाम | भूमिका |
|---|---|---|---|
| १ | **उपविभागीय कृषी अधिकारी** | **अध्यक्ष** | **टेंडर क्रिएटर/ओपनर/प्रकाशक/मूल्यांकनकर्ता** |
| २ | **सरपंच** | **सदस्य** | **ग्राम कृषि विकास समिती प्रतिनिधी** |
| ३ | **प्रकल्प सहाय्यक पर्यवेक्षक (PA-SDAO)** | **सदस्य** | **टेंडर क्रिएटर/ओपनर/प्रकाशक/मूल्यांकनकर्ता** |
| ४ | **लेखा अधिकारी** | **सदस्य सचिव** | **टेंडर क्रिएटर/ओपनर/प्रकाशक/मूल्यांकनकर्ता** |
| ५ | ग्राम कृषी विकास समितीने अधिकृत केलेले समितीचे २ सदस्य | | **ग्राम कृषि विकास समिती प्रतिनिधी** |

* उप विभागीय कृषी अधिकारी कार्यालय हे ग्राम कृषी विकास समितीच्या (GKVS) किमान २ सदस्यांच्या उपस्थितीत (ऑनलाइन/प्रत्यक्ष) महा टेंडर पोर्टलवर तांत्रिक आणि आर्थिक दोन्ही बोली उघडतील.

प्रकल्पांतर्गत मृद व जलसंधारण कामांची ई-निविदा करावयाच्या कालावधीत गावामध्ये प्रशासक नियुक्त असल्यास अश्या गावातील कामाच्याबाबत मॉडेल २ चाच वापर करून ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. अश्या परीस्थितीत मॉडेल २ साठी सरपंच व ग्राम कृषी विकास समितीचे २ सदस्य यांची आवश्यकता नसून ई-निविदा प्रक्रिया उपविभागीय कृषी अधिकारी,प्रकल्प सहाय्यक पर्यवेक्षक व लेखा अधिकारी यांच्या मार्फत राबविली जाईल.

मृदा व जलसंधारण च्या कामांना सक्षम प्राधिकारी यांचे कडून तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**निविदा प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्या नुसार कार्यवाही जबाबदारी बाबत तपशील खालीलप्रमाणे :**

| अ . क्र. | निविदा प्रक्रियेचा टप्पा | प्रक्रिया कार्यान्वयन करणारे आणि जबाबदार अधिकारी | |
|---|---|---|---|
| | | मॉडेल १ | मॉडेल २ |
| १ | तांत्रिक मंजुरी प्राप्त कामांसाठी मॉडेल १ व मॉडेल २ प्रापण समितीस प्रापण प्रशिक्षण देणे. | प्रकल्प विशेषज्ञ प्रापण | प्रकल्प विशेषज्ञ प्रापण |
| २ | निविदा दस्तऐवज तयार करणे. | सरपंच व उप कृषि अधिकारी | उपविभागीय कृषी अधिकारी |
| ३ | अ )निविदा कार्यक्रम अंतिम झाल्या नंतर निविदा सूचना वेबसाईट व निविदा मुल्यानुसार संबंधित वृत्तपत्रात प्रसिद्धीस देणे. | सरपंच व उप कृषि अधिकारी | उपविभागीय कृषी अधिकारी |
| | ब) निविदा माहिती संचालनालयास कळविणे. निविदा वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या आहेत याबाबत खात्री करणे, तपासणे. | सरपंच व उप कृषि अधिकारी | लेखा अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी |
| | क) निविदा नोटीस बोर्डवर लावणे. | सरपंच व उप कृषि अधिकारी | लेखा अधिकारी व प्रकल्प सहायक पर्यवेक्षक |
| ४ | ई-निविदा स्वीकारणे. | सरपंच व उप कृषि अधिकारी | लेखा अधिकारी व प्रकल्प सहायक पर्यवेक्षक |
| ५ | अ) निविदा उघडणे | ग्राम कृषी विकास स्तरावरील प्रापण समिती | उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावरील प्रापण समिती |
| | ब) तुलनात्मक तक्ता तयार करणे . | ग्राम कृषी विकास स्तरावरील प्रापण समिती | उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावरील प्रापण समिती |
| ६ | तुलनात्मक तक्त्यातील तपशिलानुसार विहित निविदा मंजुरीसाठी सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे. तत्पूर्वी उपरोक्त १ ते ४ प्रमाणे कार्यवाही पूर्ण झाल्याची खात्री करणे. | ग्राम कृषी विकास स्तरावरील प्रापण समिती | उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावरील प्रापण समिती |
| ७ | निविदे वरील आधिक्य समर्थनासह प्रमाणित करणे. | ग्राम कृषी विकास स्तरावरील प्रापण समिती | उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावरील प्रापण समिती |
| ८ | १.निविदा ज्या अधिकाऱ्याचे मंजुरी अधिकार क्षेत्रात आहे त्या अधिकाऱ्याने निविदा स्वीकृत करणे.<br>२. निविदा अधिक्यास मान्यता. | उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक | |
| ९ | कार्यारंभ आदेश निर्गमित करणे | सरपंच व उप कृषि अधिकारी | उपविभागीय कृषी अधिकारी |

**निविदा मंजुरीचे अधिकार व अधिक्यास मंजुरी देण्याचे अधिकार :-**

| अ क्र | अधिकाराचे स्वरूप | प्रदान करण्यात आलेले अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | उपविभागीय कृषी अधिकारी | जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी | विभागीय कृषी सहसंचालक |
| १ | निविदा मंजुरीचे अधिकार | रु. २५ लाख किमती पर्यंत | रु. २५ ते रु. १२५.०० लाख किमती पर्यंत | रु. १२५.०० लाख किमतीच्या पुढील पूर्ण अधिकार |
| २ | अधिक्यास मंजुरी देण्याचे अधिकार (निविदेतील अंदाजपत्रकाच्या चालू दर सूचीच्या आधारे येणाऱ्या किमतीवर ) | निरंक | ५ % रु. २५ लाख किमती पर्यंतच्या निविदांसाठी | ५ % (रु. २५ लाख ते रु.१२५.०० लाख किमती पर्यंतच्या निविदांसाठी) |

- मॉडेल १ व २ नुसार निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांचेकडे निविदा मान्यतेस्तव सादर करणे बंधनकारक राहील. सक्षम प्राधिकारी यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात यावा.
- सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता देत असताना संपूर्ण प्रापण प्रक्रिया मार्गदर्शक सूचना नुसार झाल्याची खातरजमा करावी तसेच प्रापण प्रक्रियेचे सर्व दस्तावेज तपासून ते बरोबर असल्याची खात्री करावी.
- ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर Award of Contract अपलोड करून ई-निविदा प्रणालीवरील प्रक्रिया पूर्ण करावी.
- सर्व प्रकारच्या निविदा प्रक्रियेवर सनियंत्रण करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. ई-निविदेच्या जाहिरातीच्या खर्चाची प्रतिपूर्ती ही मृद व जल संधारण कामांसाठी असलेल्या २ % आकस्मिक निधीपैकी ०.५ % मधून करण्यात यावी.

**डिजिटल "की " वापरणे बाबत :-**

प्रकल्पांतर्गत उपलब्ध करून देलेल्या डिजिटल "की" चा वापर फक्त प्रकल्पाच्या ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पाव्यतिरिक्त अन्य ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी वापर करण्यात येऊ नये.

बदली झालेल्या अधिकारी/कर्मचारी तसेच सरपंच व उपसरपंच पदावरील संबंधित व्यक्तिचा कार्यकाल संपल्यास त्यांची डिजिटल "की" कोणत्याही परिस्थितीत ई-निविदा संदर्भातील कोणत्याही कामासाठी वापरु नये. बदली झालेल्या अधिकारी/कर्मचारी तसेच सरपंच व उपसरपंच पदावरील संबंधित व्यक्ति यांच्या डिजिटल कि ब्लॉक (Block) करण्यासाठी प्रस्ताव उपविभागीय कृषी अधिकारी यांनी प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे सादर करावा. नव्याने पदावर हजर झालेले उप विभागीय कृषि अधिकारी तसेच मॉडेल १ नुसार निविदा प्रक्रिया राबविणार असल्यास सबंधित सदस्यांची त्वरित नव्याने नोंदणी (रजिस्ट्रेशन) करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील.

**ई- निविदा प्रसिध्दीचा निर्धारित कालावधी पुढीलप्रमाणे समाविष्ट आहे.**

| अ.क्र | निविदा रक्कम | कालावधी | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम वेळ | द्वितीय वेळ | तृतीय वेळ |
| १ | रू. १० लक्ष ते ५ कोटी | १५ दिवस | १० दिवस | ७ दिवस |

ई- निविदाद्वारे करावयाच्या कामाची ई-निविदा ऑनलाईन प्रसिद्धी व सदर ई-निविदा वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यासाठी पुढील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे माहिती विभागाच्या संबंधित अधिकारी यांचे कडे पाठवावी.

| अ.क्र. | ई-निविदा जाहिरात तपशील | कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठवावी | वर्तमान पत्र स्तर |
|---|---|---|---|
| १ | रुपये ५०.०० लाख पर्यंत | जिल्हा माहिती अधिकारी | जिल्हास्तरावरील एका वर्तमान पत्र |
| २ | रुपये ५०.०० ते ९२.०० लाखांपर्यंत | विभागीय माहिती उपसंचालक | विभागीय स्तरावरील एका वर्तमान पत्र |
| ३ | रुपये ९२.०० लाखांपेक्षा अधिक | महासंचालक ,माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई-३२ | राष्ट्रीय स्तरावरील एका वर्तमान पत्र |

ज्या जिल्हयातील काम आहे, त्या जिल्हयातील सर्वात जास्त प्रमाणात प्रसिध्द होणारी (wide circulation) असणाऱ्या महत्वाच्या वृतपत्रात जाहिराती प्रसिध्द करणे, महासंचालक (प्रसिध्दी) यांना अनिवार्य राहील, असे निविदा प्रसिध्दी अधिकाऱ्याने नमूद करुन ई-निविदा जाहिरातीसाठी पाठवावे. ज्या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द झाली आहे ते संपूर्ण वृत्तपत्र संबंधित ग्राम कृषी विकास समिती /उपविभागीय कृषी अधिकारी यांनी नस्तीस / धारीकेस जोडावे. ई-निविदा प्रसिध्दी https://mahatenders.gov.in या वेब पोर्टल वर प्रसिध्द कराव्यात व निविदा सूचनाची एक प्रत कार्यालयीन सुचना फलकावर (नोटीस बोर्ड) लावण्यात यावी.

**निविदा शुल्क:-**

| अ. क्र. | निविदा कामांची रक्कम रू. | निविदा फॉर्म फी व निविदा प्रक्रिया फी |
|---|---|---|
| १ | १०.०० ते ५०.०० लक्ष पर्यंत | रु. ५००.०० + वस्तु व सेवा कर |
| २ | ५०.०० लक्ष ते २.०० कोटी पर्यंत | रु. १०००.०० + वस्तु व सेवा कर |
| ३ | २.०० कोटी ते ५.०० कोटी पर्यंत | रु. २०००.०० + वस्तु व सेवा कर |

**निविदापूर्व बैठक:-**

निविदा सादर करावयाच्या अंतिम दिनांकाच्या कमीत कमी पाच दिवस अगोदर निविदापूर्व बैठक घ्यावी. सदर बैठकीमध्ये ई-निविदेद्वारे प्रसिध्द करीत असलेल्या कामाच्या प्रकारनिहाय त्याचे तांत्रिक निकष, कामाची आखणी, कामे नोंदविण्याची पध्दत व सदरच्या कामामध्ये वारंवार आढळणाऱ्या त्रुटींबाबत ठेकेदारांना मार्गदर्शन करावे. तसेच करण्यात येणाऱ्या विविध करांच्या वजातीबाबत मार्गदर्शन करावे, निविदा प्रक्रियेच्या मार्गदर्शक सूचना व अटी / शर्ती यांचे वाचन करुन संबधितांना जाणीव करुन दयावी व तशी नोंद इतिवृत्तांत घेण्यात यावी.

**तांत्रिक लिफाफा उघडणे:-**

तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर निविदा सादर करणाऱ्या कंत्राटदारांच्या कागदपत्रांची छाननी (Scrutiny) सोबतच्या परिशिष्ट-३ नुसार करण्यात यावी. सर्व मुद्यांबाबत बाबनिहाय कागदपत्रांची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित ई-निविदा समितीची राहील. संबंधित ठेकेदाराने मूळ कागदपत्रे छाननीच्या वेळी समितीच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. कंत्राटदाराने निविदेसोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१. Licence copy

२. PAN Card
३. AADHAR Card
४. GST certificate व गत वर्षाचे वस्तु व सेवा कर मंजूरी प्रमाणपत्र (Clearance Certificate)
५. Turnover certificate
६. Previous work orders
७. Any type of Work Done Certificate
८. Similar type of work Any type of masonry/ concrete work activity of any department (सिमेंट नालाबांध साठी आवश्यक)
९. मागील आर्थिक वर्षाचे आयकर विवरण पत्र (इन्कम टॅक्स रिटर्न)

सिमेंट नाला बांध कामाच्या बाबतीत कोणत्याही विभागाच्या कोणत्याही प्रकारच्या दगडी बांधकाम/कॉक्रीट काम केल्याचा (Similar type of work like any type of masonry/concrete work activity of any department) संबंधित यंत्रणेचा दाखला अनिवार्य राहील.

प्रकल्पांतर्गत नवीन सिमेंट नाला बांध ची कामे वगळता इतर मृद व जलसंधारण कामांकारिता कोणत्याही प्रकारचा काम केल्याबाबतचा दाखला ( Any type of Work Done Certificate ) सादर करणे बंधनकारक राहील. निविदा प्रक्रियेत सहभागी होणारे निविदा धारक यांची नोंदणी निविदा प्रसिद्धीच्या वर्षातील असल्यास व निविदा मध्ये नव्याने भाग घेत असल्यास गत वर्षाचे वस्तु व सेवा कर मंजूरी प्रमाणपत्र व अनु क्र ५ ते ९ मधील कागदपत्र सादर करण्याबाबत सूट देण्यात यावी. सदरची सुट सिमेंट नालाबांध या कामासाठी लागू राहणार नाही.

**यंत्रसामुग्री:-**

ठेकेदाराकडे यंत्रसामग्री (मशिनरी) शक्यतो स्वतःच्या मालकीची असावी. यंत्रसामुग्री भाड्याने घेणार असल्यास रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारानामा व ज्याच्या नावे यंत्रसामुग्री आहे, त्याचे यंत्रसामुग्री परिवहन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्राची (आर.सी. बुक) प्रत जोडण्यात यावी. करारनाम्यामध्ये दर्शविलेलीच यंत्रसामुग्री कामावर असणे बंधनकारक राहील. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्रक्र-०८/इमा-२, दि. २७.०९.२०१८ मधील मुद्दा क्र. ५.५ नुसार,

अ.) यंत्रसामग्रीसाठी स्वतःच्या मालकीच्या जागेची अट टाकण्यात येऊ नये.

आ.) कामांसाठी नवीन यंत्रसामग्रीचे आयुर्मान १५ वर्षे गृहीत धरण्यात यावे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन परिपत्रक क्र. सीएटी-२०१७ / प्रक्र-०८/ इमा-२, दि. २९.०१.२०१९ मधील मुद्दा क्र. ५ नुसार परिवहन विभागाने १५ वर्षापुढील सुस्थितीतील वाहनांना लेखी परवाना दिलेला असल्यास त्याची खात्री करून यंत्रसामुग्री ग्राह्य धरण्यात यावी.

**एक निविदा (Single Tender) बाबत कार्यपध्दती:-**

ई-निविदा प्रणाली अंतर्गत संपूर्ण पारदर्शकता, योग्य स्पर्धा आणि शासनाच्या हितार्थ निविदा स्वीकृतीत एकच निविदा प्राप्त होणे शासनाच्या हिताचे नाही. त्यामुळे यापूर्वी एकच निविदा प्राप्त झाली असल्याच्या संदर्भात सार्वजनिक

बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७ / प्रक्र-०८/इमा-२, दि. २७.०९.२०१८ मधील मुद्या क्र. ४.३ नुसार पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

"एकच निविदा (Single Tender) म्हणजे निविदा सूचना प्रसिध्दी केल्यानंतर एकच निविदा प्राप्त झाली आहे. किंवा बऱ्याच निविदा प्राप्त होऊनही तांत्रिक लिफाफा क्र.१ तपासताना अन्य सर्व कंत्राटदार अपात्र ठरल्यास व केवळ एकच कंत्राटदार निविदेसाठी पात्र ठरल्यास त्या सर्व निविदा देकारांना एकच निविदा (Single Tender) म्हणून समजण्यात येईल. एकच निविदा संदर्भात आदेशित करण्यात येते की, अशा प्राप्त झालेल्या निविदा, लिफाफा क्र.२ न उघडता तात्काळ फेटाळण्यात याव्यात व लगेचच नवीन निविदा मागविण्यात याव्यात. मात्र यासंदर्भात मूळ प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल करु नये. मूळ प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही व्दितीय मागणी समजण्यात येईल. अशा मागणी नंतर जर परत एकच निविदा प्राप्त/पात्र झाल्यास अशा निविदा बाबत निविदा उघडून प्रचलित कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करावी. अशा निविदे बाबत पुनःश्च फेर निविदा मागविण्याची आवश्यकता नाही."

प्रचलित दरसूची पेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाल्यास याबाबत लगतच्या वरिष्ठस्तरावर पूर्ण समर्थनासह मंजुरीकरीता त्या अंदाजपत्रकातील बाबींचा अभ्यास करुन व बाबींच्या दराविषयी खात्री करुन आवश्यक असल्यास प्रारुप निविदा मसुदयात आवश्यक तो बदल आणि कामाची गुणवत्ता व दर्जा खालावणार नाही याची खात्री करुन काही अटी शिथिल करण्याबाबत व अंदाजपत्रकीय किमतीत दर पुनर्विलोकनामुळे वाढ होत असल्यास त्याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.

जर या निविदा मान्य करण्यासारख्या नसतील तर त्या सक्षमस्तरावर रद्द करुन निविदा अटींची फेरतपासणी करावी व स्पर्धात्मक दर प्राप्त करण्यासाठी अटी शिथिल करुन फेर निविदा मागवाव्यात. तदनंतर अशा बदललेल्या निविदेस प्रसिध्दी देऊन परत देकार मागविण्यात यावेत. असे देकार प्राप्त झाल्यानंतर परत प्रथम वेळेस एकच निविदा प्राप्त झाल्यास ती नाकारावी व दुसऱ्या वेळेस निविदा मागवावी. दुसऱ्या वेळेस एकच निविदा प्राप्त झाल्यास व ती निविदा, प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा संचातील अटी व शर्तीनुसार छाननी अंती पात्र ठरत असल्यास, तसेच ती अंदाजित दरापर्यंत स्वीकारण्याचे अधिकार पुढे उल्लेख केल्या प्रमाणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत जिल्हा निविदा समितीस राहील.

अशा निविदा धारकांची निविदा स्वीकारण्याबाबत योग्य तो निर्णय जिल्हा निविदा समितीने निविदा उघडल्यापासून ८ दिवसात घ्यावा.

| | |
|---|---|
| १. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी | : -अध्यक्ष |
| २. कृषी उप संचालक (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय) | :-सदस्य |
| ३. संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी | :-सदस्य |
| ४. लेखा अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय | :-सदस्य |
| ५. नोडल अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय | :-सदस्य सचिव |

प्रथम मागणीच्या वेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास तीन पात्र निविदा प्राप्त नाही म्हणून प्राप्त दोन निविदा नाकारण्यात येतात ही बाब CVC नियमास धरुन नाही. कालापव्यय होऊ नये व कामे वेळेवर व्हावीत, यासाठी दोन पात्र निविदा प्राप्त झाल्यास त्या उघडण्यात याव्यात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन परिपत्रक क्र. सीएटी-२०१७/प्रक्र-०८/इमा-२, दि.२९.०१.२०१९ मधील मुद्या क्र.१ नुसार प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास

नियमानुसार लिफाफा क्र.२ (आर्थिक देकार) उघडून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रथम बोली वेळी प्राप्त निविदांमध्ये तीन पात्र निविदा असण्याची आवश्यकता नाही.

**निम्नतम देकाराच्या निविदा स्वीकृती संदर्भात सुधारीत मार्गदर्शक सूचना:-**

निविदा दरापेक्षा २०% पर्यंत कमी दराची निविदा आल्यास खालील मार्गदर्शक सूचना प्रमाणे ती निविदा स्वीकारणेबाबत निविदा प्राधिकारी यांनी निर्णय घ्यावा. २०% पेक्षा अधिक कमी दराची निविदा आल्यास वरीलप्रमाणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हास्तरीय निविदा समितीमार्फतच दर विश्लेषण आधारावर ८ दिवसाचे कालावधीत पडताळणी करून खालील मार्गदर्शक सूचना प्रमाणे निर्णय घ्यावा.

**अ.)** निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा दहा टक्क्या पेक्षा अधिक दराने कमी असेल तर संबंधित कंत्राटदाराकडून एवढया कमी दरात काम करण्याचे नियोजना बाबत सविस्तर दर पृथःकरण तपशील निविदा बोलाविणाऱ्या अधिकाऱ्याने प्राप्त करुन घ्यावे. कंत्राटदाराने दिलेल्या तपशीलाच्या आधारे सदर काम निम्नतम देकाराच्या किमतीत पूर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करुन लेखी हमीपत्र घेऊन निर्णय घेण्यात यावा.

**आ.) अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) भरणे.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्रक्र-०८/इमा-२,दि. २७.०९.२०१८ मधील मुद्दा क्र. ५.१.१ व समक्रमांकाचे परिपत्रक, दि. २६.११.२०१८ मधील सुधारित सूचना क्र. १ व २ नुसार कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराच्या १० % पेक्षा कमी दर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम / कामगिरी सुरक्षा ठेव रकमेची बँक प्रतिभूती हमी जमा करणे आवश्यक आहे. लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या एल-१ निविदाकाराने अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) आठ दिवसाच्या आत संबंधित निविदा प्रक्रिया राबविणाऱ्या कार्यालयाकडे जमा करण्याबाबतच्या अटीचा समावेश निविदांमध्ये करण्यात यावा व निविदेबाबत पुढील कार्यवाही करावी. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही. निर्धारित रकमेपेक्षा कमी रकमेची बँक प्रतिभूति हमी सादर केल्यास अथवा आवश्यक बँक प्रतिभूती हमी सादरच न केल्यास सदर कंत्राटदाराची निविदा विहित मुदतीत रद्द करण्यात यावी.

प्रथम न्यूनतम देकाराच्या (एल-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) चा भरणा केला नाही तर त्याची निविदा रद्द केल्याचे लेखी कळवून व्दितीय न्यूनतम देकाराच्या (एल-२) निविदाकारास एल-१ निविदाकाराच्या नमुद दराने अथवा त्यापेक्षा कमी असलेल्या दराने काम करणेबाबत लेखी विचारणा करावी. एल-२ निविदाकार एल-१ पेक्षा कमी दराने किंवा एल-१ च्या दराने काम करण्यास तयार असल्यास त्यांची निविदा मंजूर करावी. एल-२ निविदाकार यास तयार नसेल तर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकरी यांचे अध्यतेखालील समिती मार्फत निविदा प्रक्रिया बाबत निर्णय घ्यावा.

निविदा लिफाफा क्र.१, निविदा लिफाफा क्र. २ आणि निविदा स्वीकृती यात विलंब झाल्यास त्याची समर्थनीय कारणे जसे की न्यायालयीन प्रकरणे, तक्रार प्रकरणे इत्यादीबाबत सखोल माहिती अभिलेखावर ठेवावीत.

अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) भरताना कंत्राटदाराची निविदा देकार २ दशांशपर्यंत ग्राहय धरुन (Rounded up to two decimal points) त्याप्रमाणे रक्कम परिगणित करण्यात यावी. अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या DD / FDR / BG स्वरूपात स्विकारण्यास हरकत नाही.

**आ.)** निविदा लिफाफा क्र.१ उघडणे व निविदा लिफाफा क्र.२ उघडणे या दोन कृतीमध्ये फक्त तीन दिवसांचे अंतर असावे. निविदा लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर निविदा स्वीकृती प्रस्ताव (AOC- Award of Contract) तीन दिवसाच्या कालमर्यादेत https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर अपलोड करावे.

**इ.)** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्रक्र-०८/इमा-२, दि. २७.०९.२०१८ मधील मुद्दा क्र. ४.६ व समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि. २६.११.२०१८ मधील सुधारित सूचना क्र.३ नुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव संबंधी सूचना:-

१. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० % पर्यंत कमी दरात असेल तर कंत्राटदाराने निविदाधीन किमतीच्या १ % एवढी रक्कम अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून DD/ FDR /बँक प्रतिभूती हमीव्दारे संबंधित निविदा प्रक्रिया राबविणाऱ्या कार्यालयाकडे आठ दिवसाच्या आत जमा करावी.

(उदा. १% ते १० % कमी दर-१% रक्कम)

२. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० % पेक्षा कमी दराने कमी असेल तर, ठेकेदाराने १५ % पर्यंत पुढील प्रत्येक % करीता अतिरिक्त प्रत्येकी १ % प्रमाणे अतिरिक्त सुरक्षा ठेव आठ दिवसाच्या आत जमा करावी. सदर रक्कम रुपये १०००/- पेक्षा कमी असल्यास किमान रक्कम रुपये १०००/- DD/ FDR /बँक प्रतिभूती हमीव्दारे सादर करणे अनिवार्य राहील. (उदा. १५ % कमी दराने निविदा असेल तर १० % पर्यंत १ % व १० ते १५ % करीता ५ % असे एकूण ६ % तेवढी रक्कम अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम विहित स्वरुपात प्राप्त करुन घ्यावी.)

देकार १५% पेक्षा जास्त कमी दराचा असल्यास पुढील प्रत्येक वाढीव कमी % दरासाठी दोन पटीने (दुप्पट) रक्कम DD/ FDR /बँक प्रतिभूती हमीव्दारे सादर करणे अनिवार्य राहील.

( उदा. निविदेचा देकार १९ % पेक्षा जास्त कमी दराने असल्यास अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कमेचे पृथ:करण खालीलप्रमाणे असेल.)

१० % कमी दरापर्यंत १ % व

१५ % पर्यंत कमी दरापर्यंत:- (१५ %- १० %= ५ %)

तसेच १९ % पर्यंत कमी दरापर्यंत ( १९ % - १५% ) = ४ % करीता (४ x २) = ८ %

असे एकूण (१ + ५ + ८) = १४ % रक्कम अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम विहित स्वरुपात प्राप्त करुन घ्यावी

१) बँक प्रतिभूती हमी किंवा DD/ FDR द्वारे भरणा करण्याची पध्दती ऐच्छिक असावी.

२) बँक प्रतिभूती बाबत-: बँक प्रतिभूती हमी/ DD/ FDR= उपलब्ध करुन देणे बँकेची प्रतिभूती हमी परत करणे व इतर बाबींबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

a) बँक प्रतिभूती हमी / DD/ FDR निविदा बोलाविणाऱ्या उपविभागीय कृषी अधिकारी याच्या नावे असावी.

b) बँक प्रतिभूती हमीची /DD/ FDR सरकारी /शेडयुल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील राष्ट्रीयीकृत बँकेची असावी.

c) बँक प्रतिभूती हमीची / DD/ FDR ची मुदत कामाच्या दोष दायित्व कालावधीनंतर किमान १ महिना कालावधी पर्यंत असावी.

d) खोटी कागदपत्रे /बँक प्रतिभूती हमी सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात यावी व जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने संबंधित कंत्राटदारांना काळया यादीत टाकावे तसेच यापुढील निविदेसाठी त्याला अपात्र ठरविण्यात यावे. अशा काळ्या यादीत समाविष्ट केलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा उघडू नयेत.

e) निविदेतील लिफाफा क्र. १ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहतील. याबाबतचा स्पष्ट उल्लेख निविदेत करावा.

**ई.)** उपविभागीय कृषी अधिकारी यांनी निम्नतम निविदाकाराकडून प्राप्त बँक प्रतिभूती हमीची मुदत दोषदायित्व कालावधी नंतर एक महिन्यापर्यंत असल्याची खात्री केल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करावी.

**उ.)**काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर काम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन घेऊन निविदेतील तरतुदींप्रमाणे ठेकेदारांकडून प्राप्त अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम / बँक प्रतिभूती हमी ३ महिन्याच्या आत कंत्राटदारांना उपविभागीय कृषी अधिकारी यांनी परत करावी. असे न केल्यास विलंब कालावधीचे व्याजासह अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम /बँक प्रतिभूती हमी रक्कम परत करण्याची जबाबदारी संबंधित रक्कम जमा करून घेणारे अधिकारी यांची राहील.

**ऊ.)** मॉडेल १ प्रमाणे निविदा प्रक्रिया राबविल्यास अतिरिक्त सुरक्षा ठेव व सुरक्षा ठेव संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी यांचे नावे घेऊन कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर उप कृषी अधिकारी यांनी लेखी पत्राद्वारे उपविभागीय कृषी अधिकारी यांच्याकडे जमा करावी.

**निविदांच्या तांत्रिक लिफाफा क्र. १ ची छाननी व मुल्यांकन करताना निविदा उघडणाऱ्या अधिकाऱ्यांनी व निविदा पडताळणी समितीने घ्यावयाची दक्षता व तद्नुषंगाने सूचना:-**

प्रचलित पध्दतीप्रमाणे निविदा मॉडेल १ प्रमाणे ग्राम कृषी विकास समितीच्या प्रापण समिति व मॉडेल २ प्रमाणे उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या स्तरावरील प्रापण समिति समोर उघडल्या जाव्यात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्रक्र-०८/इमा-२, दि. २७.०९.२०१८ मुद्या क्र. ४.५ नुसार निविदा पडताळणी समितीने पुढीलप्रमाणे कामकाज करावे.

अ.) निविदा पडताळणी समितीने निविदा उघडल्यानंतर त्यांनी निविदेची छाननी करुन यासाठी निविदेच्या पात्रते/अपात्रते विषयी काही शंका निर्माण झाल्यास, विशेषत: खालील बाबींवर त्यांनी कंत्राटदारांकडून स्पष्टीकरण मागविणे अनिवार्य राहील.

(१) नोंदणी विषयक कागदपत्रे
(२) पॉवर ऑफ ऑटर्नीबाबतची स्पष्टीकरणे
(३) कंत्राटदाराने सादर केलेल्या तांत्रिक व आर्थिक विवरणात संदिग्धता व त्रुटी आढळत असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण.
(४) सिमेंट नाला बांध/वळण बंधाऱ्याची लांबी, उंची व कामाचे गुणवत्ता निकष, कामांच्या बाबींच परिमाण व दर.
(५) भागीदारी (जॉइंट व्हेंचर/Joint venture) असल्यास त्यासंबंधी करारनाम्यात त्रुटी असणे, प्रमाणित नसणे, करारनामा नोंदविलेला नसणे, भागीदारीचे शेअर नमूद नसणे.
(६) आर्थिक ताळेबंद व विवरणातील त्रुटीबाबतचे स्पष्टीकरणे.
(७) तांत्रिक लिफाफ्यातील सादर केलेले प्रस्ताव/कागदपत्रातील अटी/शर्ती व पत्र व्यवहारातील संदिग्धता, अस्पष्टता इत्यादी.

याबाबत निविदा उघडणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित कंत्राटदारास पात्र/अपात्र ठरविण्यापूर्वी त्यांचे बरोबर लिखित स्वरुपात पत्रव्यवहार करावा व कंत्राटदारांकडून लिखित स्वरुपात स्पष्टीकरण घेऊन ते पडताळून त्याची खातरजमा करावी. किरकोळ व महत्व नसलेल्या अटीमुळे निविदाकरास अपात्र करण्यात येऊ नये. अशा ठिकाणी कंत्राटदाराकडून लेखी स्पष्टीकरण घ्यावे व अटी व शर्ती नुसार दुरुस्त कागदपत्रे प्राप्त करुन समितीसमोर ठेवून त्याची छाननी करुन कंत्राटदाराच्या निविदा पात्रता/अपात्रते विषयी निर्णय घ्यावा. याबाबतचे सर्व अभिलेख धारिकेत व

संकेतस्थळावर ठेवावे व निविदा स्वीकृतीसाठी सादर करण्याच्या प्रस्तावात या सर्व पडताळणी पध्दतीचा स्पष्ट उल्लेख करावा.

बऱ्याचदा एक निविदा उघडण्यावेळी पात्र असलेल्या कंत्राटदारास दुसऱ्या निविदावेळी अपात्र ठरविण्यात येते. यात कदाचित कंत्राटदाराचे संगनमत (Cartel Formation) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव ज्यांनी देशात/ राज्यात अथवा सां.बां.विभागात सक्षमपणे कामाच्या स्वरुपानुसार समतुल्य कामे केली आहे अशा कंत्राटदाराच्या निविदा केवळ किरकोळ कारणास्तव (जसे की PTC, Machinery, आयकर कागदपत्रे, Similar work condition) अपात्र करु नयेत. अशा कंत्राटदारांनी त्यांची पूर्वीची कागदपत्रे दोन दिवसात उपलब्ध करुन दिल्यास ती पडताळून व खात्री करून पात्र ठरवण्याबाबत निर्णय घ्यावा व आर्थिक लिफाफा क्र.२ उघडावा.

अन्य बाबतीत असेही आढळून आले आहे की, काही कंत्राटदार निविदा सादर केल्यानंतर म्हणजेच Bid lock झाल्यानंतर तांत्रिक लिफाफा उघडताना त्यांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येऊ नये असे लेखी पत्राव्दारे निविदा समितीस/संबंधितांस कळवितात. त्यामुळे कंत्राटदारांचे संगनमत (Cartel Formation) झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन परिपत्रक क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.-८/इमा-२, दि. २९.०१.२०१९ मधील मुद्दा क्र.७ नुसार अशावेळी संबंधित कंत्राटदाराचा लिफाफा क्र. २ उघडण्यात यावा व आर्थिक देकार उघडल्यानंतर संबंधित कंत्राटदार पात्र ठरल्यास कार्यारंभ आदेश देण्यासंदर्भात नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. जर कंत्राटदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन अशा कंत्राटदारास कृषी विभागातील सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास एका वर्षासाठी प्रतिबंध करण्यात यावा. या संबंधी प्रस्ताव संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी यांनी सा.बा.विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण/०५/०६/प्र.क्र.५३/ ईमा-२, दि. २८.०९.२००६ व शासन परिपत्रक क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र.४८२/जल-७, दि.०७.११.२०१७ नुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समन्वय समितीस सादर करावा. अशा निविदा प्रक्रियेमध्ये फेरनिविदा मागवून पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

### ई निविदा स्वीकृती:-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.-०८/ इमा-२, दि. २७.०९.२०१८ मधील मुद्दा क्र.५ नुसार शासनाच्या ई-निविदा वेबसाईट, वेब पोर्टलवर प्रसिध्द झाल्यानंतर निविदेतील अटी व शर्तीमधे अंशत: ही बदल करण्यात येऊ नये. त्यामुळे ई निविदेतील आशय अथवा तारखेत बदल करावयाचे झाल्यास ते सक्षम प्राधिकाऱ्याच्या लिखित पूर्व परवानगीनेच करण्यात यावेत. अशा मंजुरी प्रदान करताना सदर बाबतचे पत्र व त्याची कारणेही संबंधित वेबसाईटवर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावीत.

### इसारा रक्कम (Earnest Money Deposit):-

ज्यावेळी कंत्राटदार कामासाठी निविदा सादर करतो त्यावेळी प्रत्येक कामासाठी स्वतंत्रपणे इसाराची रक्कम भरणे आवश्यक आहे. इसारा रक्कम भरण्यास सूट देण्याची तरतुद यापूर्वीच रद्द करण्यात आली आहे. इसारा रक्कम ईनिविदाकरिता ऑनलाईन भरणे बंधनकारक राहील.

**इसारा रक्कम (Earnest Money Deposit) खालील प्रमाणे घेण्यात यावी :-**

| अ. क्र. | कामांचा तपशील | जमा करावयाची इसारा रक्कम |
|---|---|---|
| १ | रक्कम रूपये १.५० कोटी पर्यंतची कामे | निविदा रक्कमेच्या १ % |
| २ | रक्कम रूपये रु. १.५० कोटीवरील रक्कमेची कामे | निविदा रकमेच्या ०.५०% किंवा १.५० लाख यापैकी जी जास्त असेल ती रक्कम. |

**सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit):-** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी- २०१७/प्रक्र-०८/इमा-२, दि. २७.०९.२०१८ मधील मुद्या क्र. २.८ नुसार जमा करुन घेण्यात यावी.

| **अ.क्र.** | **कामांचा तपशील** | **जमा करावयाची सुरक्षा ठेव रक्कम** |
|---|---|---|
| १ | रक्कम रूपये १.५० कोटी पर्यंतची कामे | निविदा रक्कमेच्या २ %<br>(Rounded to next Rs.१०००/-) |
| २ | रक्कम रूपये रु. १.५० कोटीवरील रक्कमेची कामे | निविदा रकमेच्या १%<br>( Rounded to next Rs.१०००/-) |

**कार्यारंभ आदेश: -**

ई- निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर कार्यारंभ आदेश देण्यात यावेत. मॉडेल १ नुसार निविदा प्रक्रिया राबविल्यास सरपंच व उप कृषी अधिकारी यांच्या सयुंक्त स्वाक्षरीने पात्र निविदाधारकांना कार्यारंभ आदेश देण्यात यावा तसेच मॉडेल २ च्या बाबतीत उपविभागीय कृषी अधिकारी यांचे स्वाक्षरीने कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करण्यात यावी. कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर तात्काळ लेखा अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय यांनी निविदा प्राप्त कर्त्याची माहिती (AOC -Award of Contract Upload) संबंधित संकेतस्थळावर अपलोड करावी.

कार्यारंभ आदेश कंत्राटदारास देण्यापूर्वी पात्र ठेकेदारांकडून १% सुरक्षा ठेव रक्कम भरून घेणे अनिवार्य आहे. मॉडेल १ च्या बाबतीत सुरक्षा ठेव रक्कम संबंधित उप कृषी अधिकारी व मॉडेल २ नुसार संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी यांचे कडे जमा करण्यात यावी.

३७.) ठेकेदारास कार्यारंभ आदेश देताना त्यांचेकडून अंदाजपत्रकीय किमतीच्या २% सुरक्षा ठेव रक्कमेपैकी १% रक्कम यांनी D.D./FDR द्वारे कार्यारंभ आदेश देणेपूर्वी भरून घ्यावी. सदरची १% रक्कम निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराच्या बँक खात्यातूनच स्विकृत करण्यात यावी. तसेच उर्वरित १% रक्कम ठेकेदारास देय असणाऱ्या पहिल्या देयकातून कपात करावी.

सदरची रक्कम १ वर्षापर्यंत जतन करावयाची असल्याने कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी जमा करण्यात आलेली १ % रक्कम आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. कृआ / लेखार / संकिर्ण / सुरक्षा ठेव / १०७ / २०१९. दि. १६.०२.२०१९ नुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करुन कोषागारात जमा करुन चलन नंबर प्राप्त करुन घ्यावा. काम पूर्ण झाल्यानंतर ते काम संबंधित लाभार्थीस हस्तांतरित केल्यानंतर, कामामध्ये कोणतीही तक्रार नसल्याची खात्री करून काम पूर्णत्वाच्या तारखेपासून एक वर्षानंतर सुरक्षा ठेव रक्कम संबंधितास RTGS/PFMS/CMP द्वारे परत करावी. त्यासाठी सुरक्षा ठेव रक्कम कोषागारात जमा करते वेळेचा चलन नंबर दर्शवून पुनःश्च सदरची रक्कम पारित करुन घेऊन ठेकेदारास देण्यात यावी. उपविभागीय कृषी अधिकारी यांनी कामाबाबत तक्रार नसल्याचे व काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याचे तालुका कृषी अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेऊन सदर कार्यवाही करावी.

देयकातून कपात करण्यात आलेली १ % सुरक्षा ठेव रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर ते काम संबंधित लाभार्थीस हस्तांतरित केल्यानंतर, कामामध्ये कोणतीही तक्रार नसल्याची खात्री करून काम पूर्णत्वाच्या तारखेपासून एक वर्षानंतर सुरक्षा ठेव

रक्कम संबंधितास पोर्टल द्वारे परत करावी. यासाठी कामाबाबत तक्रार नसल्याचे व काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याचे तालुक कृषी अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१. काम पूर्ण झाल्यानंतर सुरक्षा ठेव व अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम ठेकेदारास विहित कालावधीत परत करण्याची जबाबदारी संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील. असे न केल्यास विलंब कालावधीचे व्याजासह अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम परत करण्याची जबाबदारी संबंधीत रक्कम जमा करून घेणारे अधिकारी यांची राहील.

**निविदेचा विधीग्राह्यता कालावधी (Validity Period):**

प्रकल्पांतर्गत निविदांसाठी कंत्राटदाराने भरलेल्या दरासाठी विधिग्राहयता कालावधी ९० दिवस असेल.

**ई-निविदा उघडण्याची प्रक्रिया कार्यालयीन वेळेत करणेः**

ई-निविदा प्रक्रिया ही शासनाने मंजूर केलेल्या ऑनलाईन प्रणालीव्दारे प्रदर्शित करण्यात येते. सदर प्रक्रियेमध्ये निविदा कार्यालयीन वेळेत न उघडणे, कंत्राटदाराचे अनुपस्थितीत उघडणे अशा तक्रारी होऊ नयेत म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्रक्र-०८/इमा-२, दि. २७.०९.२०१८ मधील मुद्दा क्र. ५.१.३ नुसार ज्या कंत्राटदारांनी निविदा सादर केल्या आहेत अशा बहुसंख्य कंत्राटदारांसमोर निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात यावी व अशा निविदा कार्यालयीन वेळेतच उघडण्यात याव्यात. काही अपवादात्मक परिस्थितीत सदरच्या निविदा कार्यालयीन वेळेत उघडणे शक्य नसल्यास संबंधित निविदाधारकास आगाऊ लेखी सूचना देऊन अशा निविदा कार्यालयीन वेळेनंतर उघडणे बाबत निर्णय घेण्यात यावा. कार्यालयीन वेळेनंतर निविदा उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये संबंधित निविदा धारकांपैकी बहुसंख्य निविदाधारक यांची उपस्थिती अनिवार्य राहील, यामुळे निविदा उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राहील. निविदा छाननी व निविदा स्वीकृती निविदा समितीचे सर्व सदस्यांसमोर करून समिती सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन स्वाक्षरीचा कागद कार्यालयीन दप्तरी ठेवावा.

**वस्तू व सेवा कर (GST- Goods & Service Tax) नोंदणी :- वस्तू व सेवा कर** (GST) **नोंदणी ही निविदा अधिकारी (उपविभागीय कृषी अधिकारी**), **ठेकेदार यांची होणे आवश्यक आहे**.

**अ.** मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०२२-२३ च्या सामाईक दर सूचीस शासनाने मान्यता दिलेली असून सदर दरसूची शासनाने पत्र क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.२५४/जल-१, दिनांक ३.०३.२०२३ नुसार दिनांक ०६.०३.२०२३ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर सामाईक दरसूची मध्ये जीएसटीची तरतुद नसल्यामुळे कामाच्या अंदाजपत्रकीय किमतीत संचालक मृदजलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुण यांचे संदर्भिय पत्र क्र. मृदस/मृद ६ / जीएसटी/९७४२ दि. १६.०३.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार जीएसटीसाठी तरतूद करण्यात यावी. तसेच १ टक्का विमा रक्कम व २ % आकस्मिक खर्च दाखविण्यात यावा. सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध बाबींच्या दर पृथःकरणामध्ये १% कामगार कल्याण उपकर दर्शविण्यात यावा. वस्तू व सेवा कर (GST) भार कामावर खर्ची पडेल याची तरतूद करावी. काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदारास अदा करावयाच्या देयकातून पुढील प्रमाणे २% आयकर, २% वस्तू व सेवा कर (GST) वरील टी.डी.एस., १% कामगार कल्याण उपकर व १% विमा रक्कम कपात करण्यात यावी. ठेकेदाराने सादर केलेल्या देयकामध्ये वस्तू व सेवा कर (GST) नमूद केलेला असला,

तरी त्याने प्रत्यक्ष कामाकरिता लागलेल्या परिमाणाच्या / साहित्याच्या खरेदीच्यावेळी भरलेल्या जीएसटीच्या पावत्या विचारात घेऊन तेवढ्याच वस्तू व सेवा कराची **(GST)** ची रक्कम ठेकेदारास अदा करण्यात यावी.

आ. कंत्राटदारांनी वस्तू व सेवा कर (GST) अदा केल्याची कागदपत्रे सादर केल्या नंतर मापन पुस्तिकेत त्याची नोंद घेऊन संबंधित तालुका कृषी अधिकारी यांनी कंत्राटदाराकडून सदरचे वस्तू व सेवा कर (GST) अदा केल्याचे प्रमाणपत्र/पावती Allot केलेल्या कामाचेच असल्याचे प्रतिज्ञापत्र घ्यावे व VAT/Excise या बाबी आवश्यकतेनुसार वगळून देयकांची छाननी करुन देय रकमेबाबत खात्री करून ३० दिवसांमध्ये संबंधित देयके कंत्राटदारास अदा करावीत.

**इ. वस्तू व सेवा कर (GST) वरील टी.डी.एस. भरावयाची कार्यपध्दती व मुदतः**

१.) २ % टी.डी.एस. वजावट करावयाच्या कार्यवाहीसाठी वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१८/प्र.क्र.१४४/२०१८/कोषा प्रशा-५, दि.२८.०९.२०१८ लागू राहील. तपशीलवार माहिती करीता राज्य कर आयुक्त, वस्तू व सेवाकर यांचे परिपत्रक क्र. २७ टी, दि. ०७.०७.२०१७ व अंतर्गत परिपत्रक क्र.२६ ओ, दि.१९.०९.२०१८ चे पालन करावे. टी.डी.एस. म्हणून कपात केलेली रक्कम ज्या महिन्यात कपात केली असेल त्या महिन्याच्या समाप्ती नंतर १० दिवसांच्या आत शासनाच्या खात्यात भरणे आवश्यक आहे. कपात केलेली रक्कम शासनास प्रदान केल्यानंतर ५ दिवसांमध्ये वजातीला (असा पुरवठादार ज्याचे कडून टी.डी.एस. कपात केली आहे.) जीएसटीआर-०७/ओ च्या नमुन्यात प्रमाणपत्र दयावयाचे आहे. हे प्रमाणपत्र पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन जारी करावे.

**II.) शास्ती विषयक तरतुदी:-**

अ.) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा आणि केंद्रिय वस्तू व सेवा कर कायद्याच्या कलम ५१(१) अ नुसार वजातदाराने टी.डी.एस. कपात करण्यास कसूर केली असेल किंवा कमी रक्कम कपात केली असल्यास किंवा शासकीय खात्यात जमा करण्यास कसूर केली असेल, तर वजातदार रक्कम रूपये १०,०००/- किंवा कपात न केलेल्या रकमे एवढया किंवा कमी कपात केलेल्या रकमे एवढया किंवा कपात केलेल्या परंतू शासकीय खात्यात जमा न केलेली रक्कम यापैकी ज़ी जास्त असेल तेवढया शास्तीस पात्र आहे.

आ.) वजातदाराने टी.डी.एस. प्रमाणपत्र विहित कालावधीमध्ये जारी करण्यास कसूर केली असेल तर वजातदार अशा पाच दिवसांचा कालावधी समाप्तीनंतरच्या दिवसापासून टी.डी.एस. प्रमाणपत्र जारी करेपर्यंत, विलंब फी म्हणून, प्रतिदिन रु. १००/- देण्यास पात्र असेल, ही विलंब फी रु. ५०००/- पेक्षा जास्त राहणार नाही.

ई.) मंजूर झालेल्या कंत्राटदाराने निविदा करारातील / निविदा सुचनेतील अटी व शर्तीचे पालन न केल्यास, केलेले काम निकृष्ट दर्जाचे आढळल्यास, कार्यारंभ आदेश दिलेले काम मुदतीत सुरू न केल्यास, काम सबळ कारणाशिवाय अपूर्ण ठेवल्यास, अशा कंत्राटदारावर सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण/०५/०६/प्र.क्र.५३/ईमा-२, दि. २८.०९.२००६ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार संबंधीत निविदा प्रसिद्ध करणा-या अधिकारी यांना राहतील. कंत्राटदार नियमानुसार दंडात्मक कारवाईस पात्र झाल्यास अशा ठेकेदारास काळ्या यादीत टाकणेसाठी संबंधित नोंदणीकृत विभाग यांना कळवावे व पुढील कृषी विभागाच्या निविदा प्रक्रियेसाठी संबंधित ठेकेदारास अपात्र ठरवावे.

उ. काम पूर्ण करण्याचा कालावधी खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | उपचाराचे नाव | कालावधी (दिवस) |
|---|---|---|
| १ | सलग समतल चर, खोल सलग समतल चर, ढाळीचे बांधबंदिस्ती, कंपार्टमेंट बंडींग, मजगी, पॅडी बंडींग, जुनी भातशेती बांध दुरुस्ती, लूज बोल्डर स्ट्रक्चर, गॅबियन बंधारा, माती नालाबांध, बोडी नूतनीकरण, शेततळे, नाला खोलीकरण, सिमेंट पडदिसह गॅबियन बंधारा. | ३० |
| २ | सिमेंट नाला बांध | ६० |

अपवादात्मक परिस्थितीत पाऊस, शेतपिके, शेतकऱ्यांचा विरोध / तक्रार/ निवेदन, निवडणूक आचार संहिता इत्यादी मुळे काम पुर्ण करावयाच्या कालावधीमध्ये वाढ होत असल्यास त्याबाबत खात्री करुन मुदतवाढ देण्यात यावी.

ऊ. कामे करण्यासाठी ठेकेदारांचा दर्जा व आवश्यक मशिनरी याविषयीची माहिती खालील तक्त्याप्रमाणे असावी:-

| अ.क्र. | उपचाराचे नाव | मशिनरी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|
| १ | लूज बोल्डर स्ट्रक्चर, गॅबियन स्ट्रक्चर | दगड वाहतुकीसाठी ट्रॅक्टर | १ ते ९ |
| २ | सलग समतल चर | पोकलेन , जेसीबी | १ ते ९ |
| ३ | खोल सलग समतल चर | पोकलेन, जेसीबी | १ ते ९ |
| ४ | ढाळीचे बांधबंदिस्ती, कंपार्टमेंट बंडींग | पोकलेन , जेसीबी | १ ते ९ |
| ५ | मजगी, पॅडी बंडींग | जेसीबी, ट्रॅक्टर, बलीवर्द | १ ते ९ |
| ६ | जुनी भातशेती बांध दुरुस्ती | ट्रॅक्टर | १ ते ९ |
| ७ | माती नालाबांध, बोडी नूतनीकरण, शेततळे, नाला खोलीकरण, सिमेंट पडदिसह गॅबियन बंधारा. | पोकलेन , जेसीबी, वाहतुकीसाठी ट्रॅक्टर,डंपर | १ ते ९ |
| ८ | सिमेंट नाला बांध | पोकलेन , जेसीबी, ट्रॅक्टर किवा टिपर , कॉंक्रीट मिक्सर , व्हायब्रेटर | १ ते ७ |

सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी-२००६ / प्र.क्र.१४१ / इमारती-२, दि. ०६.०२.२००७ नुसार कंत्राटदारांची नोंदणी व काम करण्याची कमाल मर्यादा यावर आधारित संवर्ग खालीलप्रमाणे राहतील.

| वर्ग | काम करण्याची मर्यादा |
|---|---|
| १ अ | मर्यादा नाही |
| ब | रु. २५०० लाख |
| क | रु. १५०० लाख |
| २ | रु. ७५० लाख |
| ३ | रु. ३०० लाख |
| ४ | रु. १५० लाख |
| ४अ | रु. ९० लाख |
| ५ | रु. ५० लाख |
| ५अ | रु. ३० लाख |

| | |
|---|---|
| ६ | रु. १५ लाख |
| ७ | रु. १० लाख |
| ८ | रु. ५ लाख |
| ९ | रु. ३ लाख |

ऋ. पाणलोटातील उपचार अंमलबजावणीमध्ये ई- निविदा कार्यवाही बंधनकारक आहे. ई-निविदा कार्यपध्दतीद्वारे ठेकेदार यांना दिलेली कामे पुढील पावसाळ्यापूर्वी कार्यारंभ आदेशान्वये दिलेल्या मुदतीत पूर्ण होण्यासाठी एका ठेकेदारास एका उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयाचे कार्यक्षेत्रात सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी-२००६/प्र.क्र.-१४१ / इमारती-२, दि.०६.०२.२००७ नुसार ठेकेदाराच्या काम करण्याच्या कमाल मर्यादेच्या अधिन राहून आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. मृदसं / मृद-६ / ई-निविदा / ३१४, दि. ०६.०२.२०१६ नुसार जास्तीत जास्त रक्कम रु.५०.०० लाख या मर्यादेत ई- निविदाद्वारे कामे देण्यात यावीत.

कंत्राटदारास एका उपविभागात रक्कम रुपये ५० लाखाच्या मर्यादेतच कामे देण्यात यावीत. तसेच निविदा प्राप्त सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित ठेकेदारास त्यापुढील नवीन कामे नियमानुसार पात्र असल्यास देणेबाबत दक्षता घ्यावी.

ल. कंत्राटदार नोंदणीकृत नसल्यास त्यास न्यायालयात Cavet दाखल करुन व कंत्राटदारास १५ दिवसाची नोटीस देऊन त्यावर कंत्राटदाराचे उत्तर प्राप्त करुन छाननी अंती कंत्राटदारास काळ्या यादीत टाकणे बाबतचा प्रस्ताव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना सादर करावा. ठेकेदारानी कार्यरंभ आदेश देऊनही कार्यारंभ आदेशामध्ये नमुद केल्यानुसार वेळेत काम सुरु केले नाही किंवा काम निर्धारित वेळेत पूर्ण केले नाही तर प्रथम त्यांना ३ वेळा कारणे दाखवा नोटीस देऊन काळ्या यादीत का टाकण्यात येऊ नये याबाबत कंत्राटदाराचा खुलासा पुराव्याच्या दस्तऐवजांसह घ्यावा. त्यानंतरही त्यांनी खुलासाही दिला नाही व काम सुरु केले नाही किंवा काम वेळेत पूर्ण केले नाहीतर अशा ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत प्रस्ताव जिल्हा अधीक्षंक कृषी अधिकारी यांना सादर करावा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी संबंधीत ठेकेदार यांना काळ्या यादीत टाकणेची कार्यवाही करुन याबाबत ठेकेदाराची ज्या विभागाकडे नोंदणी झालेली आहे त्यांना तसेच राज्यातील कृषी विभागातील सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी यांना कळविण्याची कार्यवाही त्वरित करावी.

ऍ. ठेकेदारास काळ्या यादीत टाकल्यानंतर संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी यांनी ठेकेदाराने जमा केलेली अतिरीक्त सुरक्षा ठेव रक्कम (ॲडीशनल परफॉर्मन्स सिक्युरिटी डिपॉझीट) व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करावी. त्यांची सुरक्षा ठेव रक्कम परत करु नये व त्यांना कोणतेही नवीन काम देण्यात येऊ नये.

ऐ. ई-निविदा मंजूर झालेल्या प्रत्येक ठेकेदाराकरीता उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय स्तरावर नस्ती तयार करावी. उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी यांचेकडून ठेकेदारास केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जतन करुन ठेवाव्यात.

**ए. गौण खनिज उत्खनन व स्वामित्वधनाबाबत**

शासन परिपत्रक क्र. गौखनि.-१०/१०१२/ प्र. क्र. ६०३/ख/दि. १/११/२०२१ नुसार महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकस व विनियमन) (सुधारणा) नियम, २००५ नियम ४६ अप नियम (१) अन्वये केलेल्या सुधारणांनुसार दि. १ नोव्हेंबर २०२१ पासून पुढीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक निर्देश देण्यात आले आहेत.

अ) एखाद्या भूखंडाचा विकास करताना माती, मुरूम, दगड अशा सर्व प्रकारच्या गौण खनिजाचे उत्खनन करून ते गौण खनिज त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरीता वापरले जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रीयेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा गौण खनिजावर स्वामित्वधन आकारणीस पात्र राहणार नाही.

ब) कंत्राटदाराकडील यंत्रसामुग्रीद्वारे केलेली कालवा स्वच्छता (गाळ उपसा) व दुरुस्तीची कामे नियमित देखभाल व दुरूस्ती असल्याने सदरचे काम मायनिंग ॲक्टिव्हिटी (Mining Activity) ठरत नाही. त्यामुळे अशा कामामुळे निघणाऱ्या गौण खनिजावर स्वामित्वधन देय ठरत नाही. तसेच सदर गाळ / मातीचा शेतकऱ्यांनी शेती सुधारण्यासाठी पुनःश्च वापर केल्यास अशा उत्खनन केलेल्या गाळ / मातीवर स्वामीत्वधन आकारण्यात येऊ नये.

**नोंदवहयाः-**

ई-निविदाच्या अनुषंगाने जतन करावयाच्या विविध नोंदवह्यांचे नमुना प्रपत्र / परिशिष्ट सोबत जोडली आहेत. त्यानुसार **मॉडेल १ व २ नुसार झालेल्या सर्व ई-निविदाच्या बाबतीत आवश्यक नोंदी घेऊन विविध नोंदवह्या उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या स्तरावर** कायमस्वरुपी (Permanent Record) जतन कराव्यात.

| अ.क्र. | नोंदवहीचे नाव | कार्यालय स्तर |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम ( Performance Security Deposit) जमा व परत केल्याची नोंदवही | उपविभागीय कृषी अधिकारी |
| २ | ई-टेंडर तपशील नोंदवही | उपविभागीय कृषी अधिकारी |
| ३ | कार्यारंभ आदेश नोंदवही | उपविभागीय कृषी अधिकारी |
| ४ | सुरक्षा ठेव जमा व परत केल्याबाबत नोंदवही | उपविभागीय कृषी अधिकारी |

**प्रापण लेखापरीक्षण:**

सदर खरेदी प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडणे आवश्यक असून या सर्व खरेदी प्रक्रियेचे प्रापण लेखापरीक्षण प्रकल्पामार्फत नियुक्त केलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत तसेच महालेखाकार कार्यालयामार्फत होणार आहे.

## परिशिष्ट -१

निविदा पूर्व तपासणी सूची

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | कामाचा प्रकार | |
| २ | पाणलोट क्रमांक | |
| ३ | गट क्रमांक व गावाचे नाव | |
| ४ | तालुका व जिल्हा | |
| | तांत्रिक मान्यता | |
| | i) क्रमांक व दिनांक | |
| | ii) अंदाजपत्रकाची रक्कम | |
| | iii) समाविष्ट कामे (संख्या) | |
| | iv) एकूण रक्कम (रु) | |
| | v) दरसूची विभाग व दिनांक | |
| ५ | लाभधारकांचे समंती पत्रके आहेत का? (परिशिष्ट १३) | |
| ६ | १ निविदा अंदाजपत्रकीय किमंत | |
| | २ दरसूची वर्ष (DSR,CSR,MREGS,etc.) | |
| ७ | निविदा प्रसिद्धीचा दिनांक | |
| ८ | निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | |
| ९ | निविदा उघडण्याचा दिनांक | |

**मॉडेल १ — सहाय्यक कृषी अधिकारी　　उप कृषी अधिकारी　　उपसरपंच　　सरपंच**

**मॉडेल २ - प्रकल्प सहाय्यक पर्यवेक्षक　　लेखा अधिकारी　　उपविभागीय कृषी अधिकारी**

## परिशिष्ट -२

निविदा उघडल्यानंतर करावयाची तपासणी सूची

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | एकूण किती निविदा प्राप्त झाल्या आहेत. | |
| २ | तांत्रिक निविदा उघडलेले पात्र कंत्राटदार | |
| ३ | निम्नतम देकार सादर केलेल्या कंत्राटदाराचे नाव व देकार | |
| ४ | निविदेमधील सर्व कलमे शासनाचे नियमाप्रमाणे आहेत का? | |
| ५ | उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयातील प्रकल्प सहाय्यक पर्यवेक्षक व लेखा अधिकारी यांनी निविदा पूर्व तपासणी सूची नुसार तपासणी केलेली आहे काय? | |
| ६ | शेड्युल बी मध्ये प्रस्तावित बाबनिहाय दरांचे आकडे अंकांमध्ये व अक्षरामध्ये योग्यरीत्या आहेत काय? | |
| ७ | बाबनिहाय तपशिलाची तपासणी करण्यात आली आहे काय? व ते योग्य आहेत काय? | |
| ८ | अपात्र ठेकेदारांची नावे व अपात्रतेची कारणे काय? | |
| ९ | निविदेचा विधी ग्राह्य कालावधी किती आहे? | |
| १० | पात्र कंत्राटदाराने यापूर्वी या स्वरुपाची कोणती कामे केली आहेत त्याची यादी सादर केली आहे काय? (Appendix "A") | |
| ११ | कंत्राटदाराची सध्या सुरु असलेल्या कृषी विभागाच्या इतर कामांची यादी सादर केली आहे काय? (उपविभाग/कामे संख्या/रक्कम (Appendix "B")) | |
| १२ | कंत्राटदाराकडे कामासाठी उपलब्ध असलेल्या यंत्रसामग्रीचा तपशील सादर केला आहे काय? (Appendix "C") | |
| १३ | कंत्राटदाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक मनुष्यबळ चा तपशील सादर केला आहे काय? (Appendix "D") | |
| १४ | सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे क़ंत्राटदाराचे रु. ५००/- च्या स्टंप पेपरवरील प्रतिज्ञापत्र जोडले आहे काय? (Appendix "E") | |
| १५ | रक्कम रु. ५० लाखाची मर्यादा निश्चित केली आहे काय? | |
| १६ | निविदा उणे दाराची असल्यास उणे दाराच्या निविदेबाबत ठेकेदाराने सादर केलेले स्पष्टीकरण काय आहे? | |
| १७ | पात्र ठेकेदाराचा अंतिम देकार निविदाधीन कामाच्या किमंतीपेक्षा दहा टक्क्यापेक्षा कमी दराने असेल तर मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही केलेली आहे काय? | |
| १८ | निविदा मंजुरीसाठी अभिप्राय व शिफारस | |
| | अ) ई-निविदासाठी अंतिम मंजूर केलेला निविदाधारकाचे नाव | |

| | | |
|---|---|---|
| | ब) निविदा दर (कमी/अधिक % .....) एल-१ /एल-२/एल-३ इ. (टिप:- एल-१ ठेकेदार काम करण्यास तयार नसेल तर एल-२ ठेकेदाराला एल-१ च्या दराने निविदा मंजूर करावी.) | |
| | क) एल-२ ठेकेदारानेही एल-१ दराने काम करण्यास नकार दिल्यास फेर निविदा प्रक्रियेकरिता शिफारस केली आहे काय? | |
| १९ | पात्र ठेकेदाराचे नाव व निविदा मंजुरीचा सविस्तर तपशील. | |

**मॉडेल १ — सहाय्यक कृषी अधिकारी** **उप कृषी अधिकारी** **उपसरपंच** **सरपंच**

**मॉडेल २ - प्रकल्प सहाय्यक पर्यवेक्षक** **लेखा अधिकारी** **उपविभागीय कृषी अधिकारी**

परिशिष्ट -३

Sub Division Agriculture Office -------

(Details of Tender opening/Technical evaluation (Folder 1)

For the year 20 to 20

Micro watershed no.
Tender Reference No.
Name of Work
Tender Amount
Ernest Money
Date of Tender opening
Time of tender opening
Contents of documents submitted by contractors: -

| Sr. No. | Name of Contractor Mob no/Address | Contractor Registration/ Licence No & Validity | Available Machinery/ Agreement | ITR last year | Similar type of work done certificate(CNB) / Any type of work done certificate | No of works in hand & Tender Proposal | Technical Person details | GST No & Registration Certificate | Pretax registration no & certificate | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |

मॉडेल १ — सहाय्यक कृषी अधिकारी उप कृषी अधिकारी उपसरपंच सरपंच

मॉडेल २ - प्रकल्प सहाय्यक पर्यवेक्षक लेखा अधिकारी उपविभागीय कृषी अधिकारी

## परिशिष्ट — ४

### अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम जमा व परत केल्याची नोंदवही

| अ. क्र. | सूक्ष्म पाण लोट क्र. | तालुका | गाव | कामाचे नाव व गट क्र | ई-निविदा क्र व दिनांक | कंत्राटदाराचे नाव व पत्ता | कंत्राटदार नोंदणी वर्ग | ई-निविदा रक्कम (रु) | ई-निविदा किती कमी दराने मंजूर | अतिरिक्त सुरक्षा ठेव | | | कार्यारंभ आदेश क्र व दिनांक | अतिरिक्त सुरक्षा ठेव कार्यालयाच्या खात्यावर जमा केल्याचा दिनांक | कोषागारात diposit जमा केल्याची रक्कम (रु) चलन क्र व दिनांक | काम पूर्ण केल्याची दिनांक | अतिरिक्त सुरक्षा ठेव परत केल्याची दिनांक | ठेकेदाराची पोहोच/दिनांकित स्वाक्षरी | कार्यालय प्रमुखाची दिनांकित स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | बँक ग्यारंटी / डी. डी. क्र. | रक्कम (रु) | दिनांक | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट — ५

## ई-निविदा तपशील नोंदवही

| अ.क्र. | सूक्ष्म पाणलोट क्र. | जाहिरात क्र व दिनांक | निविदा क्रमांक | तालुका | गाव | कामाचा प्रकार | गट क्र. | ई-निविदा प्रसिद्धी रक्कम (रु) | ई-निविदा प्रसिद्धी दिनांक | ई-निविदा भरणे अंतिम दिनांक | जाहिरातीनुसार ई-निविदा उघडण्याची निनांक | प्रत्यक्षात ई-निविदा अंतिम केलेला दिनांक | % वारी ई-निविदा किती अधिक / कमी दराने मंजूर | निविदा मंजूर ठेकेदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट — ६

## उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयात ठेवावयाची कार्यारंभ आदेश नोंदवही

| अ.क्र. | तालुका | सूक्ष्म पाणलोट क्र. | गावाचे नाव | कामाचा प्रकार | गट क्र. | कार्यारंभ आदेश क्र व दिनांक | मंजूर ई — निविदा प्रमाणे रक्कम (रु) | ठेकेदाराचे नाव, संपर्क ई-मेल | १% सुरक्षा ठेव निधी जमा रक्कम (रु) व दिनांक | कार्यालय प्रमुख स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

## Appendix — ७

Details of other works tendered for and works in hand as on the date of tender.

| Sr.No | Tender No | Name of Work | District and state | Works in hand | | | Works tendered for | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Tendered Cost Rs. | Cost of remaining works Rs. | Anticipated date of completion | Estimate cost Rs. | Date by which decision is expected | Stipulated date or period of completion | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

## Appendix A

**Details of the works of similar type and magnitude carried out by the Tender**

| Reno | Tender No. | Name of Work | District and State | Tendered Cost Rs. | Time in which completed | Stipulated date of completion and actual date of completion with reasons (if delayed) | Pricipal features |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

Signature of Contractor　　　　No of Corrections　　　　SDAO

## Appendix B

**Details of other works tendered for and works in hand as on date of the Tender**

| Reno | Tender No. | Name of Work | District and State | Works in hand | | | Works Tendered for | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Tendered Cost Rs. | Cost of remaining work Rs. | Anticipated date of completion | Estimated Cost Rs. | Date by which decision is excepted | Stipulated date or period of completion | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

Signature of Contractor

No of Corrections

SDAO

## Appendix C

**Details of Plant & Machinery immediately available with the Tendered for use on this work**

| Sr.No. | Name of Equipment | No of Units | Kind of Make | Capacity | Age and condition | Present Location | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| A. | Excavation and laying Compaction,Equipment | | | | | | |
| | 1 | | | | | | |
| | 2 | | | | | | |
| | 3 | | | | | | |
| B | Concreting & Hoisting Equipment | | | | | | |
| | 1 | | | | | | |
| | 2 | | | | | | |
| | 3 | | | | | | |
| C | Transporting Equipment Pumping Workshop & | | | | | | |
| D | Miscellaneous Equipment | | | | | | |
| | 1 | | | | | | |
| | 2 | | | | | | |
| | 3 | | | | | | |

Signature of Contractor

No of Corrections

SDAO

## Appendix D

### Details of Technical Personnel with the Tender

| Sr.No | Description | Full Name | Length of Service in firm | Qualification | Total professional experience period & details of work carried out | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Project Manager | | | | | |
| 2 | Work Manager | | | | | |
| 3 | Civil Senior Engineer | | | | | |
| 4 | Supervisors | | | | | |

Signature of Contractor    No of Corrections    SDAO